# ऋणनिर्देश

माझा लघुप्रबंध पूर्ण होत असताना मला अतिशय आनंद होत आहे. शिक्षण घेण्याची जिद्द आणि नियमित मिळणारा कुटुंबीयांचा पाठिंबा यांमुळे कुठल्याही अडचणींना हार न जाता येथपर्यंत शिक्षण पूर्ण केले. यापुढे नवनवीन शिक्षण घेत राहीन.

## विषयनिवडी मागील भूमिका—

मी बी.ए. पदवी करिता किंवा त्यानंतरच्या एम्.ए. पदवीकरिता मराठी विषय निवडला. कारण मराठीतील सर्वच वाङ्मयप्रकार मला मनापासून आवडतात. त्यातही विशिष्ट शैली असणारी कविता अधिकच जवळची वाटली. पुढे शिक्षणातून समंजसपणा येत गेल्यावर स्त्रीवादी भूमिकेशी आपोआप नाते जुळले. याच वेळी प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंतःस्थ' हा काव्यसंग्रह वाचनात आला. आत्मभान आणि त्यायोगे येणारे समाजभान त्यासाठी करावा लागणारा संघर्ष , स्त्रीत्वाच्या जाणिवेची प्रखर आत्मपीडा याचे चित्रण यामध्ये आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या या काव्यसंग्रहामुळे एकूणच व्यक्ती-समष्टीकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. काव्य आणि स्त्रीवादी भूमिका मला आवडत होतीच. त्यामुळे मनात विचार आला की एम्. फील. पदवीकेकरिता लघुप्रबंधासाठी एखाद्या विषयाचा चिकित्सक अभ्यास करायचा असेल तर तो विषय काव्य आणि स्त्रीवादी दृष्टिकोन यांच्याशी संबंधित का नसावा? म्हणूनच प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यसंग्रंहाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे मी ठरविले. जेष्ठ साहित्यिक दया पवार (बलुतं कार) यांच्या कन्या असलेल्या प्रज्ञा लोखंडे (पवार) यांचे नाव मराठी काव्यसाहित्यात निर्मिती करणाऱ्या कवयित्रींमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. कवयित्री असण्याबरोबरच त्या लेखक आणि समीक्षकही आहेत. त्यांच्या कवितेतून होणारे स्त्रीचित्रण, समष्टीचे, सम्यकतेचे समग्र दर्शन मला विशेष भावले, त्यांच्या काव्यसंग्रहातून स्त्रीवादी जाणिवांसोबतच दलित जाणीवा आणि महानगरीय जाणीवांचा प्रवास सुरु होतो. या सर्वच अनुभूतींना प्रज्ञा लोखंडे यांनी एकाच स्त्रीवादाच्या परिप्रेक्ष्यातून पाहिले आहे. त्यामुळेच त्यांची कविता निराळी आणि संपूर्ण आशयबध्द होताना दिसते. या लघुप्रबंधकडे प्रज्ञा लोखंडे यांच्या 'उत्कट जीवघेण्या धगीवर' आणि 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या कवितासंग्रहांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

या लघुप्रबंधाच्या पूर्ततेसाठी मला जे काही करावे लागले त्यात प्रज्ञा लोखंडे यांच्या भेटीचा आणि त्यांच्या साहित्य संकलनाचा समावेश होता. त्यासाठी मी त्यांच्या घरी गेले. प्रज्ञा लोखंडे यांची पहिली भेट मला मोलाची व अविस्मरणीय वाटते. त्यानंतर आपल्या व्यस्त वेळांमधून त्यांनी वेळोवेळी मला भेट दिली. त्यांच्या भेटीने, सहकार्याने व मार्गदर्शनाने मी उत्साहाने हे संशोधनाचे काम करु शकले.

या लघुप्रबंधासाठी मला मार्गदर्शिका लाभल्या त्या डॉ. सौ. नलिनी महाडीक मॅडम. यांच्या समर्थ मार्गदर्शनामुळेच मी हा लघुप्रबंध पूर्ण करु शकले. माझ्या अनेक

घरगुती अडचणींमुळे माझ्या हातून होणाऱ्या चुकांना आणि लागणाऱ्या विलंबाला त्यांनी समजून घेतले. माझ्यावर कधीही रागवल्या नाहीत. त्यांच्या या अनंत उपकारांची जाणीव मला सतत राहील. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याऐवजी त्यांच्या ऋणातच राहण्यात मला धन्यता वाटेल.

माझे प्रेरणास्थान माझे वडील श्री. बबनराव माने आणि आई सौ. मायावती यांच्या आशीर्वादामुळे आणि माझ्या शिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे मला नेहमीच प्रोत्साहन मिळत गेले. त्यामुळे मी हे काम पूर्ण करु शकले. तसेच माझे पती श्री. सचिन कांबळे यांच्या प्रोत्साहनामुळे आणि मुलगी श्रावस्ती हिच्या सहकार्यामुळे मी हा अभ्यास पूर्ण करु शकले. माझ्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील डॉ. सौ. भुतकर मॅडम, डॉ. शिवाजी पाटील सर, मानसी लाटकर मॅडम यांनी मला थेअरी अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन केले. तसेच माझ्या लघुप्रबंधाच्या कामाची वेळच्या वेळी चौकशी करुन प्रोत्साहन दिले. आमच्या कॉलेजचे प्राचार्य जे.जी. जाधव यांनी संशोधन कामाची चौकशी करुन प्रेरणा दिली. या कामासाठी आमच्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या ग्रंथालयाकडून संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, इ. साहित्य उपलब्ध झाले. या सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

माझ्या या लघुप्रबंधाच्या कामामध्ये माझी भावंडे सुलभा, सुचेता, स्वप्निल यांनी वेळोवेळी मदत केली. माझ्या मोठया बहिणी सौ. स्मिता आणि सौ. स्मृती यांचीही साथ लाभली. तसेच सासुबाई आणि सासरे आणि माझ्या मैत्रिणी शीतल जाधव, मनोरमा सोनावणे आणि वनिता नाळे यांनी वेळोवेळी माझ्या कामाची चौकशी करुन मला मोलाचे सहकार्य केले. व कामपूर्ण करण्यास प्रेरणा दिली. या सर्वांची मी ऋणी राहीन. याशिवाय माझ्या ज्ञात, अज्ञात अशा अनेक शुभचिंतकांचा यामध्ये महत्वपूर्ण वाटा आहे.

सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग अत्यंत कमी वेळेत करुन देणारे मे. शीतल एन्टरप्राईजेस साताराचे श्री. भस्मे व त्यांचे सहकारी यांची मी मनःपूर्वक आभारी आहे.

ठिकाण– सातारा

दिनांक– ७।१०।२००९

कु. माने सुमती बबनराव.